## (२) कर्नाटक राज्य :

कर्नाटक राज्यात प्राचीन जैन साहित्य निर्मिती ,प्राचीन जैन आचार्य परंपरा, भव्य असे शिल्प असलेली जिनमंदिरे यामुळे संपूर्ण कर्नाटक राज्यात जैन संस्कृती समृध्द आहे. प्राचीन जैन साहित्य तेलगू,कानडी लिपीमध्ये हजारोंच्या संख्येत जैन मठात उपलब्ध आहे. मुडबिद्री, श्रवण बेलगोला येथील समृध्द भट्टारकांच्या गाद्या जैन साहित्याचे निर्मिती स्थळ आहे. भारतातील अतिप्राचीन जिनमंदिरे व तेथील शिल्प, मुडबिद्री, हलेबीड, विजयनगर, बदामी याठिकाणच्या जिनमूर्त्या आणि मंदिरे याची साक्ष आहेत.कदंब वंश, सात वाहन, गंगवंश, चालुक्य वंश आदि राज्यवंशाचे राजे जैन होते.प्राचीन आचार्य पंरपरेत भद्रबाहू, जिनसेनाचार्य आणि कुंद- कुंदाचार्य हे कर्नाटकातीलच. षटखंडागम साहित्य निर्मितीकार मुनी भूतबली आणि पुष्पदंत हे कर्नाटकमधीलच. आधुनिक आचार्य पंरपरेमधील चारित्र्य चक्रवती आचार्य शांतीसागरजी, आचार्य विद्यान्ण्दजी, आचार्य विद्यासागर,आचार्य देशभूषण हे विद्वान आचार्य कर्नाटकमधीलच.

आजतागायत ही मुनी पंरपरा कर्नाटकात विशेष:त बेळगाव जिल्ह्यात अविरत चाळू आहे. प्राप्त कर्नाटक राज्यात एकही सिध्दक्षेत्र किंवा कल्याणक क्षेत्र नाहीत परंतु जैन साहित्य निर्मिती विशाल आहे. भ. बाहुबलीची - गोमटेश्वराची जगत विख्यात मूर्ती कर्नाटकामधीलच.

### अतिशयक्षेत्र - कमठाण

मार्ग: सोलापूरहून- बीदर सडकमार्गे कमठाण हे गाव २०० कि.मी वर आहे. गावाच्या पश्चिम बाजुला विस्तीर्ण अशा बंदीस्त आवारात अतिशय क्षेत्र श्री पार्श्वनाथ कमठाण म्हणून प्रसिध्द आहे. मूलनायक अतिशय युक्त भगवान पार्श्वनाथाची प्रतिमा भुयारामध्ये विराजमान होती. तत्ककालीन मुसलमान राजांच्या छळामुळे ती मूर्ती सुरक्षीत ठिकाणी ठेवलेली होती. परंतु १९९२ साली मुनीश्री १०८ श्रुतसागरजी यांच्या प्रेरणेने भुयारातून ती मूर्ती वर आणून प्रतिष्ठित केली आहे. मूर्ती अत्यंत प्रसन्न मुद्रेत असून शांतीचे भाव आपल्यात उत्पन्न होतात. क्षेत्रात त्यागी निवास ,मुनींच्या चरण छत्र्या आहेत.

वार्षिक रथोत्सव - प्रतिवर्षी माघ शु.७ रथ सप्तमीस उत्सव असतो.

सुविधा: मंदिराच्या आवारात आधुनिक धर्मशाळा उपलब्ध आहेत. भोजनाची सोय नाही.

## अतिशयक्षेत्र - विजापूर (सहस्त्रफ़णी भ. पार्श्वनाथ)

मार्ग: सोलापूरहून विजापुरास सडकमार्गे ९५ कि.मी विजापूर शहरापासून कि.मी अंतरावर दिंगबर जैन मंदिर दर्गा विभाग येथे स्थित आहे. ५ फ़ूट उंच असलेली सातिशय एक हजार सर्पफ़णायुक्त पार्श्वनाथांची प्रतिमा आहे. अशा पध्दतीची प्रतिमा भारतात अन्य कोठेही नाही. मूर्तीच्या एका सर्प फ़ण्यात दूध टाकले असता संपूर्ण सर्फ़फ़ण्यातून दूध येते.

विजापूरातील इतर ऐतिहासिक वास्तुमध्ये गोलघुमट ही वास्तु संपूर्ण विश्वात एक वैशिष्टपूर्ण आहे. त्या इमारतीच्या घुमटाचे क्षेत्रफ़ळ १८३७७ चौ. फ़ूट आहे आणि ४० मीटर उंच इतकी आहे. यातील वैशिष्ट म्हणजे एका ठिकाणी आवाज केल्यास तो सात वेळा प्रतिध्वनीत होता. इब्राहिम रोजा, पुतलीबावडी मुलक मैदान तोफ़ पंचधातूंची वैशिष्टपूर्ण अशी व इतर ऐतिहासिक वास्तु विजापुरात पहावयास मिळतात. हे नवे शैक्षणिक केंद्र बनत आहे.

सुविधा: या शहरात अनेक हॉटेल्स आहेत.

## अतिशयक्षेत्र - मलखेड(मान्यखेट)

मार्ग: गुलबर्गा सेडम सडक आणि रेल्वे मार्गावर गुलबर्ग्यावरू न ३८ कि.मी वर हे क्षेत्र आहे.

सध्या मलखेड हे गांव अतिशय लहान आहे. त्या ठिकाणी जैन वस्ती नाही. परंतु मलखेड ही ऐतिहासिक मान्यखेट नगरी राष्ट्रकूट वंशाची राजधानी होती. अनेक योजने लांबी -रूं दी असलेली नगरी जैन संस्कृतीचे माहेरघर होते. प्राचीन जैन साहित्याचे पीठ होते. तेथे निर्माण झ ालेले कानडी जैन साहित्य अमर आहे. पुष्पदंत षटखंडागम निर्मितीकार येथीलच. मलखेड गावांत नेमिनाथ बस्ती आहे. ९ व्या शतकातील प्राचीन भग्न अवस्थेतील जिन मंदिर आहे. भ.

मुनिसुव्रत यांची खडगासनावरील सातिशय मूर्ती असून कास्य धातूचे खंडीत अप्रतिम छोटे मंदिर आहे. सन १९९६ पासून मुनीश्री १०८ श्रुतसागर यांचे प्रेरणेने संपूर्ण मंदिराचा कायापालट झ ालेला आहे. नवनिर्मित मंदिर आणि मंडपाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

सुविधा: धर्मशाळा बांधलेली आहे.

## :बदामी:

मार्ग: सोलापूर - विजापूर सडक मार्गे १५० कि.मी व रेल्वे मार्गे सोलापूर हुबळी रेल्वे लाईनवर १२८ कि.मी अंतरावर आहे.

बदामी हे ऐतिहासकालीन गाव असून जवळच पहाडावर ४ गुंफ़ा आहेत. पैकी ४ थ्या गुंफ़ेमध्ये ३१ फ़ूट रूं द व १६ फ़ूट लांब मंदिर असून भ. पार्श्वनाथ, भ. महावीर आणि गौतम स्वामी यांच्या मूर्त्या आहेत. भगवान बाहुबलीची ८ फ़ुटी उंच अशी वैशिष्टपूर्ण प्रतिमा आहे. इतर गुंफ़ात महाकटेश्वर, मेलगुटी व शिवालय हिंदुचे कोरलेले मंदिर दर्शनीय आहेत.

सुविधा: विशेष व्यवस्था नाही.

## अतिशयक्षेत्र - स्तवनिधी (तवंदी)

मार्ग: सोलापूर - कोल्हापूर मार्गे महामार्ग क्र४ वर निपाणी शहरापासून ५ कि.मी महामार्गाच्या बाजूलाच हे क्षेत्र आहे. हे क्षेत्र ब्रह्मदेव (यक्ष) मंदिर नावाने प्रसिध्द आहे.

मूलनायक पार्श्वनाथ भगवंताचे मंदिर असून पार्श्वनाथांचे यक्ष मंदिर धरणेंद्र (ब्रह्मदेव) म्हणून मंदिराच्या बाजूला शेंदूर लेप लावलेले ब्रह्मदेव मंदिर प्रसिध्द आहे. या ठिकाणी जैन-अजैन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी दर्शनास येत असतात. प्रत्येक अमावस्येला मोठी यात्रा भरत असते. मंदिराच्या तीन बाजूनी रमणीय असे पहाड असून तेथील स्थळ विलोभनीय

आहे. मानस्तंभ आहे. महामार्गाच्या बाजूलाच दि. जैन गुरू कुल व वसतिगृह असून पार्श्वनाथ तीर्थंकराची ११ फूट उंच प्रतिमा वेदीवर प्रतिष्ठित आहे.

सुविधा: मंदिराच्या आवारात तिन्ही बांजूनी सर्व सोयीनीयुक्त धर्मशाळा असून भोजनव्यवस्था उपलब्ध आहे.

## अतिशयक्षेत्र - कोथळी

मार्ग: निपाणी शहरापासून १८ कि.मी व चिकोडी शहरापासून ३ कि.मी स्थित हे क्षेत्र आहे. एका विशाल अशा पहाडावर नवनिर्मित मनोज्ञ अशा एकवीस फूट उंच असलेल्या भ.वृषभनाथ , भ. बाहुबली आणि भ. भरत यांच्या तीन मुर्त्या विशाल अशा प्रांगणामध्ये आहेत. मूर्तीच्या चोहोबाजूंनी २४ तीर्थंकरांच्या मुर्त्या प्रतिष्ठित आहेत. पहाडाच्या पायथ्याशी जैन गुरूकुल व वसतिगृह आहे.

सुविधा: सर्वसोयीनी युक्त अशी आधुनिक धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - हुनचलगी (हुंचलगी)

मार्ग: सोलापूरहून सडकमार्गे अक्कलकोट - दुधनी मार्गे १२० कि.मी अंतरावर व रेल्वे मार्गे सोलापूरहून सावळगी येथे उतरू न ३ कि.मी पायी अंतरावर किंवा गुलबर्गा येथून बसने क्षेत्रावर जाता येते.

अतिशयक्षेत्र पद्मावती माता म्हणून प्रसिध्द आहे. मंदिर पुरातन असून मूलनायक भ. पार्श्वनाथांची सातिशय मूर्ती विराजमान आहे. परंतु हे स्थान भ. पार्श्वनाथांची यक्षीणी पद्मावती मातेचे मंदिर म्हणून प्रसिध्द आहे. असे म्हणतात की, देवाला फुल वाहिल्यास देवीने उजवा कौल दिल्यास शुभ घडते. भाविक लोक आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी सतत दर्शनास येत असतात. प्रत्येक अमावस्येस या ठिकाणी मोठी यात्रा भरते. वार्षिक उत्सव मार्ग. कृ. ११ .

सुविधा: मंदिराच्या आवारात धर्मशाळा व भोजन व्यवस्था आहे.

## अतिशयक्षेत्र - वारंगा

मार्ग: कारकल -सिमोगा बसमार्गावर २५ कि.मी दूर आहे.या छोट्या गावात भगवान चंद्रनाथ तीर्थंकरांचे मंदिर भुयारात असून मूर्ती पारदर्शी आहे.चतुर्मुख बस्ती एका तलावाच्या मधोमध चबुत-यावर निर्मित अशी आहे. हे बाराकोनी मंदिर असून पार्श्वनाथ, नेमीनाथ, अनंतनाथ आदीच्या मूर्त्या गोलाकार वेदीमध्ये विराजमान आहेत. या ठिकाणी दोन कन्नड शिलालेखही आहेत.

सुविधा: राहण्याची सोय नाही.

## अतिशयक्षेत्र -कारकल

मार्ग: मेंगलोर - सिमोगा राज्य रस्त्यावर मेंगलोरवरू न ६३ कि.मी व मुडबिद्रीवरू न २६ कि.मी दूर आहे. कारकल हे क्षेत्र काळ्या ग्रेनाईट पाषाणासाठी प्रसिध्द आहे. कारकलमध्ये एकूण २३ जिनालये असून अत्यंत प्राचीन आहेत. कारकल नरेश वीर पांडेद्वारा इ.स. १४३४ मध्ये एका पहाडावर भ. बाहुबलीची ४२ फूट उंच असलेली मनोज्ञ अशी मूर्ती आहे. मूर्तीच्या समोर २० फ़द्नट उंच मानस्तंभ आहे. पार्श्वनाथ मंदिरात तेथील भट्टारकांच्या गादी आहे.

(१) नेमीनाथ बस्ती ६०० वर्षे प्राचीन असून मूलनायक भ.नेमीनाथांची खडगासनस्थ प्रतिमा आहे.

(२) भ. वृषभनाथांचे चार दिशेस चार मुखे असलेले भव्य मंदिर असून मंदिरासमोर ६० फ़द्नट उंच मनोज्ञ मानस्तंभ आहे. मंदिराची शिल्पकला अत्यंत भव्य व सुंदर आहे.

सुविधा: सर्व सोयीनयुक्त धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र  - मुडबिद्री( दक्षिण जैन काशी)

मार्ग: सोलापूरहून विजापूर- बदामी - शिमगो मार्गे ३०० कि.मी व मेंगलोरपासून ३४ कि.मी अंतरावर हे क्षेत्र आहे. इ.स. पूर्व तिस-या शतकापासून ते इ.स. सातव्या शतकापर्यंत मुडबिद्री हे जैन धर्माचे मुख्य केंद्र होते. अतिंम श्रुतकेवली भद्रबाहू यांचे शिष्यांनी तेलगु, कानडी भाषेमध्ये धर्मप्रचार केला. येथून जैन लोक चीन, मलाया, इंडोनेशिया आदि देशात व्यापार - व्यवसायासाठी जात असत. त्यामुळे येथील मंदिरावर ड्रेगन, जिराफ़ आदि प्राण्यांचे चित्रण, त्रिभुवन तिलक मंदिरात पहावयास मिळ्ते. मुडबिद्री येथे एकूण १८ भव्य जिनालये आहेत. पैकी खालीलप्रमाणे उल्लेखनीय व दर्शनीय असे आहेत.

(१) गुरू बस्ती: इ.स. ७१४ मध्ये बांधल्याचा उल्लेख आहे. या मंदिरात हिरे, माणिक,स्वर्ण आदि रत्नांच्या ३४ जिन प्रतिमा आहेत. येथे धवल, जयधवल, महाधवल आदी जैन सिध्दांत ग्रंथाचे ताडपत्रीवर लिहलेले ग्रंथ उपलब्ध आहेत.

(२) त्रिभुवन तिलक चुडामणी बस्ती: एक हजार कलापूर्ण खांबाचे तीन मजली विशाल असे मंदीर सन १४३० इ. मध्ये निर्माण केले गेले. मूलनायक चंद्रप्रभूची मनोज्ञ अशी पंचधातुंची प्रतिमा आहे. मंदिरासमोर ५० फ़ुट उंच मानस्तंभ आहे.

(३) पंडुबस्ती: हे अत्यंत प्राचीन मंदिर असून दुस-या मजल्यावर तीन ते चार हजार ताडपत्रीवर लिहलेले ग्रंथ असून आता ते रमराणी जैन शोध संस्थानतर्फ़े विद्वानासाठी उपलब्ध करू न दिलेले आहे.

(४) जैन मठ बस्ती: येथे भ.पार्श्वनाथ जिन मंदिर असून अनेक प्राचीन दुर्मिळ ग्रंथ पहावयास मिळ्ते. या ठिकाणी भट्टारकांची गादी आहे.

सुविधा: राहण्याची व्यवस्था आहे.

## अतिशयक्षेत्र - हुमचा पद्मावती

मार्ग - सोलापूर-विजापूर-हुबळी-शिमोगा मार्गे ३५० कि.मी. व शिमोगापासून ६० कि.मी अंतरावर हे क्षेत्र आहे. येथे मुख्य मंदिर पार्श्वनाथ भगवानाचे असून भगवानाची यक्षिणी पद्मावती मातेला या ठिकाणी भक्तगण मन:पूर्वक भजतात. देवी मनोकामना पूर्ण करते अशी भक्तांची भावना आहे. दररोज मूर्तीच्या पुजेच्या वेळी संस्थानाचा हत्ती पाण्याचा कलश पूजेसाठी घेऊन येत असतो. क्षेत्राजवळच पहाडावर लकी वृक्ष सदा हरीत असते. मोती तलाव व कुमदवती नदीचे उगमस्थान कुमुदतीर्थ म्हणून विशेष प्रसिध्द आहे.

सुविधा: सर्व सोयींनी युक्त धर्मशाळा व भोजनव्यवस्था उपलब्ध आहे.

## जोग फ़ॉल ( गिरसप्पा धबधबा)

मार्ग: हुबळी- बेंगलोर मार्गावरून विरू र स्टेशनपासून सडक मार्गे १६ कि.मी अंतरावर हे ठिकाण आहे. इरावती नदीवर ४ धबधबे आहेत.

(१)राजा (२) रोअरर (३) रॉकेट (४) राणी अशा ४ प्रकारचे विविध रूप घेणारे धबधबे असून निसर्गरम्य ठिकाण आहे. पर्यटक नेहमी येत असतात. इरावती नदीवरील धबधब्याखाली महात्मा गांधी जलविद्युत केंद्र आहे.विशेष परवानगीने विजेच्या पाळण्यामधून वीज निर्मिती केंद्र पाहता येते.

## क्षेत्र - बेळगांव

मार्ग: हासन ह्या जिल्ह्याच्या ठिकाणावरू न ७० कि.मी मेंगलोरवरू न ७५ कि.मी अंतरावर हे गाव आहे. धर्मस्थळास जाण्यासाठीचा मार्ग घनदाट जंगलातून पण रमणीय आहे. ५०० वर्षापूर्वीचे प्राचीन अनेक धर्माचे तीर्थस्थान आहे. येथिल श्रेष्ठी श्री विरेन्द्र हेगडे हे जैनधर्मी असून त्यांच्या

स्वत:च्या घरी २ जिनमंदिरे आहेत. भ. आदिनाथांची व इतर जिनेश्वरांच्या स्फ़टीकाच्या मनोज्ञ मूर्त्या आहेत. येथिल मुख्य मंदिर मंजुनाथ - शिवाचे मंदिर आहे. गणेश , कन्याकुमारी स्वर्णमय मूर्त्या आहेत. जैन अजैन भक्तांची हजारोंनी दर्शनासाठी रीघ लागते. जवळच विशाल पहाडावर कुरून्द पाषाणाची ३९ फ़ूट उंच असलेली भ. बाहुबलीची भव्य मूर्ती असून ६० फ़ूट चौरस दगडी कमळ पुष्पावर विराजमान आहे. धर्मस्थळ क्षेत्रावर श्री विरेन्द्र हेगडे द्वारा नि:शुल्क भोजनालय आहे. दररोज हजारो यात्रेकरू याचा लाभ घेतात. येथील व्यवस्था आधुनिक आहे.

सुविधा: संपूर्ण धर्मस्थळ गावामध्ये अनेक धर्मशाळा सर्व सुविधायुक्त आहेत.

## : हलेबीड :

मार्ग: श्रवण बेळगोळावरू न ९० कि.मी हसनवरू न ३४ कि.मी अंतरावर हे ऐतिहासिक स्थान आहे. होयसाळ राजाची राजधानी व अनेक जैन मंदिरे व हिंदू मंदिरे कलापूर्ण, अजोड शिल्पकलेने नटलेली आहेत. इ.स. ११३३ मध्ये विष्णुवर्धन राजाचा सेनापती बोधद्वारा मंदिर बांधले आहे. विजय पार्श्वनाथ वस्तीम्ध्ये १४ फ़ुट उंच भ.पार्श्वनाथाची विशाल मूर्ती आहे. मूर्तीच्या गर्भगृहात छतावर २४ तीर्थकरांचे शिल्प कोरले आहे. एकूण ९२ दगडी, गुळगुळीत खांबामुळे शोभा आली आहे. दगडावर हाताने वाजविले असता अनेक खांबातून विविध मधुर आवाज येतात. भ. आदिनाथ, भ. शांतीनाथ बस्तीच्या छतावरील दगडी नक्षीकाम अप्रतिम आहे.

हलेबीडमध्ये महाराजा विष्णुवर्धन यांची राणी शांतलाद्वारा निर्मित होयसलेश्वर. महादेव मंदिर विशाल व कलापूर्ण असून मंदिराच्या भव्य परिसरात उत्तम बाग बनविली आहे. पुराण वस्तु विभागाकडे ह्या संपूर्ण परिसराची देखभाल असून पर्यटकांचे हे कलात्मक पर्यटनस्थळ आहे. पूर्वीच्या काळी हळेबीड परिसरात ७०० जिनालय असल्याचे सांगतात.

## अतिशयक्षेत्र - श्रवणबेळगोला

मार्ग: सडकेने सोलापूर - विजापूर मार्गे ६६० कि.मी रेल्वेने सोलापूर - बेंगलोर मार्गे प्रथम बेंगलोर व नंतर बसने श्रवण बेळगोळ. बसची उत्तम व्यवस्था आहे. म्हैसूरवरू न ८० कि.मी आहे.

भ. गोमटेश्वर ( भ. बाहुबली) यांची महामूर्ती श्री चामुंडराय यांनी इ.स. ९८१ साली स्थापन केली. एकाच दगडातून ५७ फूट मूर्ती कोरून तयार केली. जगातील ८ वे आश्चर्य म्हणून ती सुप्रसिध्द आहे. अनेक जिनमंदिरे आहेत. येथे अत्यंत प्राचीन असे भट्टाचारांचे पीठ आहे. जैन संस्कृतीचे हे प्राचीन क्षेत्र असून शेकडो शिलालेख इत:स्तत: विखुरलेले आहेत. त्यामुळे जैनधर्म, संस्कृतीचा इतिहास लिहणे सुलभ झाले आहे. येथिल मठाचे महास्वामी श्री चारूकीर्ती महाराज आहेत. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी २/३ वेळा महामस्तकभिषेक घडवून आणला. जगभर प्रसिध्दी दिली गेली. त्यामुळे या क्षेत्राची महती व माहिती सर्वांना होऊ शकली. दोन बाजूला दोन डोंगर आहेत. ( विंध्यगिरी) इंद्रगिरी व चंद्रगिरी ही त्यांची नावे आहेत. इंद्रगिरीवर भ. बाहुबलीची अत्यंत मनोज्ञ व विस्मयकारक मूर्ती आहे. समुद्रसपाटीपासून ३५०० फूट उंच असा हा डोंगर आहे. जाण्यासाठी पाय-या आहेत. डोलीची सोय आहे. डोंगराच्या पायथ्याशी कल्याणी तलाव आहे. पायथ्याशी जैन मठ, मंदिर व भंडारी वस्ती, भोजनालय, निवासाची सोय उपलब्ध आहे. जवळ जवळ दोन हजार वर्षे प्राचीन असे हे क्षेत्र आहे. या डोंगरासमोरच चंद्रगिरी डोंगर आहे. येथे अतिंम श्रुतकेवली, आचार्य भद्रबाहु यांनी देहत्याग केला होता. त्यांचे शिष्य भारताचे प्रथम सम्राट श्री. चंद्रगुप्त हेही त्यांचेबरोबर इथे आले होते. त्यांन बांधलेली बस्ती अत्यंत सुंदर व भव्य आहे. अप्रतिम शिल्पमंडित व ऐतिहासिक स्वरू पाचे हे मंदिर आहे. इतरही मंदिरे पाहण्यासारखी आहेत. दर बारा वर्षानी महामस्तकाभिषेक होतो.

सुविधा: सर्व प्रकारच्या सुविधा, स्वतंत्र बंगले, धर्मशाळा यांनी हा सारा परिसर शांतपणे निवास करण्यास उपयोगी असून भोजन व्यवस्था आहे.

## बेंगलोर(बंगळूर)

मार्ग: कर्नाटक राज्याची असून देशाच्या सर्व भागातून सडक मार्गे, रेल्वे मार्गे व विमान मार्गे बेंगलोरला जाता येते. त्या ठिकाणी २ जिनालय आहेत.

(१) चिकपेठ महावीर स्वामी मंदिर

(२) न्यू रोड वरील रंगा स्वामी मंदिर प्रसिध्द आहेत.

इतर प्रेक्षणीय स्थळे - (१) विधान सौंध (२) लाल बाग (३) कस्तुरबा रोडवरील संग्रालय (४) कब्बन पार्क (५) भारतीय विज्ञान अनुसंधान केंद्र (६) विमान बांधणी कारखाना अशी अनेक स्थळ आहेत.

सुविधा: चिकपेठ येथे स्वामी मंदिर, धर्मशाळा असून शहरात स्टेशन व बसस्टॅंडजवळ गुब्वी धर्मशाळा विशाल आहे.

## मैसूर

मार्ग: कर्नाटक राज्याची पूर्वीची राजधानी. बेंगलोरपासून १३९ कि.मी अंतरावर आहे. याठिकाणी दोन जिनालय आहेत.

(१) क्लॉक टॉवरजवळील दि जैन बोर्डींग परिसरात

(२) नगरपालिका कार्यालयाजवळ.

मैसूरच्या राजाचा राजवाडा सुस्थितीत असून प्रेक्षणीय आहे. चंदन लाकडावर कलाकुसर आणि रेशमी वस्त्रासाठी प्रसिध्द बाजारपेठ आहेत. येथिल चर्च आशियातील सर्वात मोठे, भव्य मानले जाते. आर्ट गॅलरी, प्राणी संग्रहालय, चामुंडी हिल, भव्य नंदी, टिपू सुलतानचा महाल, दौलत बाग, कावेरी संगम, रंगनाथ स्वामी मंदिर आदि प्रेक्षणीय स्थळे आहेत. वृंदावन गार्डन मैसूरपासून १८ कि.मी अंतरावर कावेरी नदीवरील कृष्णसागर धरण. वास्तुशिल्पाचा उत्तम नमुना आहे. हे धरण श्री विश्वेश्वरया या वास्तु शास्त्रज्ञाने बांधले आहे. वृंदावन बगीच्याची कांरजे, अनेक वृक्षे, वेली- फुले आदीची रचना भव्य असून हजारो पर्यटक दररोज या ठिकाणीस भेट देत असतात.